# प्रकरण - चौथे

## नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथालेखनाचे अन्यविशेष


४.१ घटना - प्रसंग

४.२ सुभाषिते, म्हणी आणि वाक्यप्रचार

४.३ वातावरण

४.४ 'संदर्भ' आणि 'काफिला' कथासंग्रहातील सारखेपण

४.५ वैशिष्ट्ये

# नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथालेखनाचे अन्यविशेष

मागील प्रकरणात नागनाथ कोत्तापल्लेंच्या कथासंग्रहातील अभिव्यक्ती पाहिल्या. त्याचप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात 'काफिला' आणि 'सदर्भ' या कथासंग्रहातील दिसून येणारे अन्यविशेष पहावयाचे आहे. या दोन कथासंग्रहाचा अभ्यास त्यातील घटना - प्रसंग, सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार, वैशिष्ट्ये तसेच कथासंग्रहातील सारखेपणा यांच्या अनुषंगाने करावयाचा आहे. घटना - प्रसंग आणि त्याला निगडीत असणारे वातावरण किती एकरूप झालेले आहे. वातावरणामुळे आशय कसा समृध्द बनत गेला आहे. तसेच कथेतील त्यांचे स्थान लेखकाच्या लेखनाचे विशेष इत्यादी दृष्टीने प्रस्तुत कथासंग्रहाचा अभ्यास या प्रकरणात अभिप्रेत आहे.

## ४.१) घटना - प्रसंग

समाजामध्ये अनेक घटना घडत असतात, कारण माणसाचे जीवन हे विविधांगी, विविधरंगी, विविधरूपी असे आहे. मुल ज्यावेळी जन्मते त्यावेळी प्रथम ते रडते की मी या तुरूंगात बंदीवान झालो म्हणून आणि ज्यावेळी मनुष्य मरतो त्यावेळी सुद्धा रडतो की या लोकातून मी चाललो म्हणून आणि जीवन जगत असतो तेंव्हा सुद्धा दु:खी असतो कारण आता मी जगू कसा म्हणून. सुखापेक्षा दु:खाच्याच घटना माणसाच्या आयुष्यात जास्त प्रमाणात येत असतात. म्हणूनच संत तुकाराम म्हणतात 'सुख पाहता जवापाडे । दु:ख पर्वताएवढे' याची सतत प्रचिती येत राहते. माणसाला सुख, दु:ख, राग लोभ, वैर - मत्सर हे मानवी विचार यांना जीवनात वेळोवेळी सामोरे जावे लागत असते. हेच मानवी जीवनात घडणारे घटना - प्रसंग हे कधी जीवन जगायला भाग पाडतात तर कधी जीवन नकोसे वाटायला लावतात.

कोत्तापल्लेंनी ह्याच घटना प्रसंगाचे वर्णन आवर्जुन कथामध्ये मांडल्याचे दिसून येते. कथालेखनाचा महत्वाचा मुद्दा म्हणजे घटना आणि प्रसंगच. 'चक्र' या कथेमध्ये

एकाचवेळी दोन घटना घडताना दिसतात. इकडे सुरेशचा बाप मरतो तर इकडे कथानायक बापू याची ताई बाळंतपणाला आली होती. तिला त्यासंबंधी त्रास चालू होता. या दोन घटनांच्या मध्ये प्रसंग एक म्हणजे मध्यरात्र होती. दुसरे म्हणजे पाऊस कोसळत होता. सुरेशचा भाऊ लांबवर म्हणजे कोल्हापूरला राहत होता. त्यामुळे दोन्हीकडील मुख्य जबाबदारी होती ती बापूवर. सुरेश पडला गरीब आणि मुख्य म्हणजे याच्या जातीतील कोणीच आसपास किंवा गावात नव्हते. बापू अणि पाटलोबातात्यामुळे मयत ताटीला बांधून घेऊन जातात पण तिथ प्रसंग वेगळाच आहे.

'' हे रं काय भगवाना ? काय केलंस हे?''

'' आता काय सांगू तात्या, रॉकेल कुठंच नाही गा. मास्तरनं लेकराची शपथ घेतली ... मग आम्ही विचार केला रॉकेलच नाही तर आता गोवऱ्या अणि लाकडाचा काय उपयोग?'' [१]

अशाप्रकारे अग्नी द्यायला शेवटी रॉकेल कुठंच मिळत नाही अशी वाईट परिस्थिती, त्यात वरून पाऊस झोडपतोय, हिंदू धर्मात प्रेत जाळतात पुरत नाहीत पण हे दोन्हीही शक्य नसल्याने सुरेशच्या दादाना गंगार्पन केलं जातं. असा प्रसंग पहायला मिळतो.

'विनोद' या कथेमध्ये मोहन याने गोल्ड मेडल मिळवले तरी सुद्धा त्याला नोकरी नाही. सतत प्रेमाने हात फिरवणारी आई मात्र मोहन नोकरी करत नाही म्हणून राग करत असते. मोहनला घरखर्च चालविण्यासाठी चोरटे व्यवहार करावसं वाटत नाहीत. बातम्या मिळवून तरी किती पैसे मिळणार, त्यात मनोहररावा बरोबर हा नोकरीच्या शोधात जातो. पण शेवटी त्याला चोरटे व्यवहार करणाऱ्या लोकामध्येच नोकरी मिळते. त्या मंडळाच्या कॉलेजमध्ये त्याला नोकरी देतात. त्या वेळी त्या व्यक्तींना वाटते की जन्मभर आपला गुलाम तरी राहील.

'' शिवाजीरावही आता रंगात आले होते. चिकनची तंगडी हातात धरून म्हणाले, '' बर का मोहनराव, आता तुम्ही आमचे झालात म्हणून सांगतो, काय पण

पोरगी होती कच्ची काकडी. पण छ्या, सगळं झाल्यावर आरडा ओरडा करायला लागली. त्यात पडली दलित, म्हणजे आफतच की हो. मन्ल तिच्या आयला...''२ शिवाजीरावांनी मोहनला नोकरी दिली म्हटल्यानंतर मोहनला चांगला पुरावा हाती मिळाला असतानासुद्धा त्याला काही करता येत नाही. जर त्यांच्या - विरूद्ध लढावे म्हटल तर दोन वेळच जेवण मिळू शकणार नाही किंवा त्यांच्या हातून तो जगू शकणार नाही.

समाजात काही व्यक्ती अशा आढळून येतात की स्वत:ची भूक भागविण्यासाठी कोणत्याही टोकाला जातात. 'काळोख हुंकार' मधील शास्त्रीबुवा हे कीर्तन सांगणारे. 'लोकासांगे ब्रह्मज्ञान आपण कोरडे पाषाण' याप्रमाणे शास्त्रीबुवांचे विचार सर्वांना पटत असले तरी त्यांचे वर्तन चांगले नाही. पत्नी आजारी म्हणून ते रस्ता झाडणाऱ्या बाईला गाठून ठेवतात. जेंव्हा हे पत्नीला समजते त्यावेळी मालन नावाच्या पोरीविषयी ती सुचवते. शास्त्रीबुवांना मालनचे नाव घेताच घरभर तीच दिसू लागते. त्यात ते मालन समजून स्वत:च्याच मुलीचा नलिनीचा हात पकडतात. या प्रसंगाने पत्नी मरते. हे गावभर समजू नये यासाठी एक दिवस गारूड्याकडून नागाच पिल्लू आणतात.

''शास्त्रीबुवावांनी पेटारा आणला आणि मध्यरात्री दिला नलिनीच्या उशाला. सकाळपर्यंत नलिनी संपली होती. हिरवी निळी झाली होती..'' ३ अशी स्वत:ची चुक लपविण्यासाठी निरपराध व्यक्तींचे खुन होताना दिसतात.

स्वप्नसुद्धा कधी कधी खरी होताना दिसतात. 'ओहोळ' या कथेमध्ये तिला एक स्वप्न पडते. शक्यतो असे समजतात की स्वप्नामध्ये जसे घडते त्याच्या उलट होत असते. असेच या कथेतून दिसते. कथानायिकेला स्वप्न पडले त्यातून ती जागी होते त्यावेळी ती स्वप्नात घडलेली घटना सांगते -

' मला की नाही एक स्वप्न पडलं. आपण कुठंतरी बागेत फिरायला गेलो आणि आपल्या दोघांच्यामध्ये आपलं बाळ लूटूलूटू चालतंय. दोघांचे हात धरून गोर पान बाळ.'

'मग?'

'मग काय? संपल''' ४

स्वप्न असे पडते. आणि मुख्य म्हणजे ती गरोदर आहे. आणि त्यानंतरच 'कावळा बसो आणि फांदी मोडो' याप्रमाणे शेवटी तिचा गर्भ जातो याला कारणीभूत ते दोघेच असतात. असे वेगवेगळया घटना जीनवात नकळत होऊन जातात.

घटना- प्रसंगाशिवाय कथा निर्माण होऊच शकत नाही. काहीतरी जीवनात घडत असतं म्हणून साहित्य निर्माण होतं. अशा अनेक घटना कोत्तापल्लेंच्या अनुभवाला आल्या त्या त्यानी येथे साकारलेल्या दिसतात. त्यांची अशीच एक 'कळा ज्या लागल्या जीवा' ही कथा आहे. पाटीलबाईंच्या हॉस्पीटलमध्ये बाळंतपणात बाई गेल्याचं अनुभवाला आलं नव्हतं. त्यात बाई मेली म्हटल्यानंतर दुसऱ्या बाळंतीनी घाबरणारच. त्यात कथानायिका सुधा हिची पहिलीच डिलेव्हरी होती. सुधाला जेंव्हा त्रास होतो त्यावेळी तिला वाटले की, या क्षणी कुणी कुणांचं नसतं. त्या दहा दिवसात तिला वेगवेगळे अनुभव येतात. डिलेव्हरी केस येत असतात तितकेच सुटकेनंतर जात असतात. कॉट रीकामी राहतच नाही. त्यात काहींची मुलं खराब होत. काहींचे घरातील लोक पहायला येत नसत किंवा बिल देत नसत अशा वेगवेगळ्या घटना तिला पहायला मिळतात.

काहीवेळेला अशा काही घटना घडत असतात की आपण समाजाला घाबरून निर्णय बदलत असतो. 'पाठलाग' या कथेमध्ये कोत्तापल्लेनी अशीच एक घटना प्रकट केली आहे. भारतीय स्त्री ही शेवटी संस्कृती जपते असे म्हटले तरी चालेल. राणीचे रघुवर प्रेम आहे. ती रघुबरोबर पळून जाऊ शकली असती तसा तो एक दिवस म्हणतो -

"माझ्याबरोबर चल" त्यावेळी ती म्हणते

"जमणार नाही रे ते माझ्याने. माझ्यात तेवढं धाडस नाही. आणि खरं सांगू माझ्या डोळ्यापुढे ह्यांचा केविलवाना चेहरा उभा राहतो बघ. आणि त्याहीपेक्षा महत्वाचे म्हणजे मी लवकर म्हातारी होईन... "

"ए. अशी वटवट करू नकोस. अशाने मी येणारच नाही बघ."

"माझा तुझ्यावर किती जीव आहे म्हणून सांगू' कसं सांगू रे! पण आताशा

ह्यांना नेहमी माझा संशय येतोय बघ.''[५] शेवटी स्त्री ही स्वत:च्या पतीइतका इतर कोणाचाही विचार करत नाही मग जरी तिचा प्रियकर असेल तरी अशा समाजात अनेक घटना घडत असतात.

'दिवा' या कथेत पाऊस' नसल्याने सर्व लोक चिंताग्रस्त आहेत त्याना वाटते की आता पाणी विकत घ्यावे लागणार की काय? गावातील लोक पंडरीला बोलवून देव काढायला सांगतात. पंडरीच्या अंगात देवी येते. ती पाटलाला दिवा लावायला सांगते अशा वेगवेगळ्या घटना समाजात घडत असताना ग्रामीण भागात दिसून येतात.

'पाणी' या कथेत कथानायक वाळवंटात कसा जातो हे त्याला समजतच नाही. तेथे फिरून फिरून तहान लागते पण आजूबाजूला कोणीच नव्हते. शेवटी आशेचा एक किरण म्हणजे दुरून कोणीतरी येत असल्याचा आवाज येतो. त्या प्रमाणे काफिला येत असल्याचे दिसते. पाणी मिळेल या आशेने त्यांच्याकडे पाहतो पण त्यावेळी ते आपल्या टोळीत सामील होण्याविषयी सांगतात. प्रसंग कोणता पण जेंव्हा तो पाण्यासाठी याचना करतो त्यावेळी आलम्‌गीर म्हणतो - 'उंटांच्या पोटात एक पिशवी असते. त्यातील पाणी महिना दोन महिने पुरतं हा उंट मी तुला देतो. तू याला मार आणि पिशवी तेवढी अल्लद काढून घे.'[६]

अशा वेगवेगळ्या समाजात घडणाऱ्या घटना - प्रसंगाचे चित्रण नागनाथ कोत्तापल्लेनी मांडले आहे.

## ४.२) सुभाषिते , म्हणी आणि वाक्यप्रचार

सुभाषितांचा वापर पुर्वी खूप प्रमाणात केला जात असे. संस्कृत सुभाषिते ही जास्त पमाणात होती पण हळूहळू त्यातूनच म्हणी हा प्रकार उद्याला आला. 'ग्रामीण लोकजीवनाचा आरसा' म्हणजे म्हणी, वाक्यप्रचार म्हटल तरी वावग ठरणार नाही.

त्यामुळे एक लयबद्धता कथेमध्ये येत असते. या एका वाक्याद्वारे अनेक प्रकारचे बोध मिळून जातात. म्हणी, वाक्यप्रचार यामुळे भाषेला सौंदर्य प्राप्त होते. प्रमाणभाषेपेक्षा बोलीभाषेमध्ये याचा वापर जास्तप्रमाणात होत असलेला दिसून येतो. लोकजीवनात सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार याच्या पाठीमागे एक विशिष्ट परंपरा आहे. लोकजीवनातील वेगवेगळे अनुभव त्यामागे असतात. समाजामध्ये अशाप्रकारच्या म्हणी, वाक्प्रचारांचा अविष्कार होताना दिसतो.

'' अगदी मार्मिकपणे, मोजक्या शब्दात मोठे सत्य सांगणारे वचन म्हणजे म्हण होय.'' [७] असे क्राप म्हणतो. जीवनातील सार्वत्रिक अनुभवाचा आधार म्हणीला असल्यामुळे सामुहिक जीवनाचा अविष्कार त्यामध्ये होतो. त्यामुळे वेगवेगळया ठिकाणीसुद्धा त्याच त्या प्रकारच्या म्हणी आढळून येतात. म्हणी ह्या वेगवेगळ्या प्रकारात आढळतात. नात्यासंबंधी, पशुपक्षीसंबंधी, विरोध व उपहासात्मक, धर्मनीती, अनुभव आणि व्यवहारज्ञान संबंधीच्या इत्यादी अनेक प्रकारात दिसतात.

आशय आणि अभिव्यक्ती या दृष्टीने सुभाषिते आणि म्हणी यात फरक असता असे असले तरी यांच्यामध्ये जवळचा संबंध आहे. प्राचीन काळी सुभाषितांचा उपयोग जास्त प्रमाणात केलेला दिसुन येतो कोत्तापल्लेयांनी अशी काही सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार यांचा वापर साहित्यलेखनात केला आहे. तर काही ठिकाणी अशीच अलंकारी भाषा वापरली आहे.

'' जीवो जीवस्य जीवनम्'' [८]

'' धर्म म्हणजे काही अशी गोष्ट नाही, कपडे बदलण्यासारखी बदलता यावी धर्म म्हणजे पावित्र्याचे कंकण '' [९]

'' कोणीच कोणाच्या अध:पतनाला जबाबदार असत नाही. प्रत्येकजन आपापल्या अध:पतनाला आपणच जबाबदार असतो हे सोयिस्करपणे विसरतो एवढेच.'' [१०]

'' मोठ्यानं हसनारी माणसं मनानं फार सरळ असतात.'' [११]

" मानवी जीवन म्हणजे पाण्यावरचा बुडबुडा " [१२]

" आरोग्याच रक्षण करण्यासाठी दात धुवावेत. तोंड धुवावेत" [१३]

अशाप्रकारचे वेगवेगळे विचार अनेक माध्यमांच्याद्वारे कोत्तापल्लेनी वापरले आहे अशाच काही म्हणींचा वापर केला आहे.

" आलं देवाजीच्या मना तीतं कोणाचं चालंना "[१४]

" घरात नाही दाणा. अन् म्हणे मला बाजीराव म्हणा" [१५]

सुभाषिते, म्हणी याबरोबर वाक्यप्रचार काही राजकीय थाटाचे तर काही बखरीतून मांडायचे असे वेगवेगळे वाक्यप्रचार वाक्यामधून येत असताना दिसते.

'डोळ्याला डोळा न लागणे' [१६]

'जीवनदान देणे'' [१७]

'लाखोंची खांडोळी करणे ' [१८]

'तुटून पडणे' [१९]

' पाझर फुटणे' [२०]

'विषण्णतेनं नघने' [२१]

असे अनेक वाक्यप्रचार येतात. त्यांच्या शब्दरचनेच्या वापरामुळे साहित्य हे दर्जेदार वाटते.

## ४.३) वातावरण

कथासंग्रहामध्ये वातावरणाला खूप महत्व आहे. कथामधील आशय व्यक्त करत असताना त्या आशयाला साजेसे असे वातावरण निर्माण करणे गरजेचे असते. आणि

त्यामुळे कथा कादंबरीमधून वातावरणाचा उपयोग केला जातो. त्याच्यातून पुढे कथेमध्ये काय घडणार आहे याची जाणीव होते. वातावरण निर्मितीमुळेच कथा त्यातील आशय आणि त्याचा होणारा अविष्कार यामद्ये सुसूत्रता प्राप्त होते. कथामध्ये घटना, व्यक्ती जशा आवश्यक आहेत त्याचप्रमाणे कथेला सजीवता प्राप्त करून देण्यासाठी वातावरणनिर्मितीचा खूप मोठा वाटा आहे. या संदर्भात वा. ल. कुलकर्णी म्हणतात.-

'' कोणत्याही विशिष्ट भूप्रदेशात, विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटना, प्रसंग घडत असतात हे स्थळकाळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच पार्श्वभूमी किंवा वातावरणनिर्मिती होय.'' [२२]

प्रसंग - घटना चित्रित करत असताना प्रभाविपणे चित्रित करण्यासाठी वातावरननिर्मिती केली जाते. तेव्हांच त्या घटनेला महत्व प्राप्त होते. ग्रामीण कथेत येणाऱ्या चित्रणाला भरीव स्वरूप येण्यासाठी व कथा उठावदार बनविण्यासाठी वातारणनिर्मिती करणे अत्यंत महत्वाचे असते. वातावरणनिर्मितीमुळेच कथेला सौंदर्य प्राप्त होत असते. घटना, प्रसंग, व्यक्तीचे स्वभाव त्याद्वारे समजून येतात.

'संदर्भ', 'काफिला' या कथासंग्रहातून कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक पार्श्वभूमीतून वातावरण आपल्यासमोर कोत्तापल्लेनी मार्मिक शब्दात रेखाटले आहे. यानी काही कथा अशा मांडल्या आहेत की ते वातावरण मांडताना कथेचा पूर्ण सार त्यामध्ये आहे अशीच एक कौटुंबिक कथा आहे त्यामध्ये पाहिलेले स्वप्न एखाद्या चुकीमुळे एका क्षणात कसे उद्ध्वस्त होते याचे चित्रण -

'' बाहेर पूर्णपणे पाऊस थांबला होता. वादळ थांबले होते. कमालीचे शांत शांत वाटत होते. गोलघुमट गुढत्व हरवून स्वच्छ स्वच्छ दिसत होता.. आणि सदाशिवला असे वाटत होते की ही इमारत आता कोसळणार. आपणाला खाऊन टाकणार. आता पावसाने झोडपायला सुरूवात केलीच पाहिजे. त्याशिवाय ही वाढती कासाविशी संपणार नाही...'' [२३]

काही कथामधून त्यानी अशी परिस्थिती दाखवली आहे की, जेंव्हा दोन वेळेचे अन्न मिळविण्याची कुवत आपल्यात नसते. माझ म्हणून काहीतरी सांगाव म्हणजे ते

आपल्या काही मालकीच नाही या चक्रात सापडलेल्या नायकाच्या भावावस्थासंबंधी प्रकट केलेले वातावरण -

" ...घाणीतले किडे वेगाणे सरपटू लागतात ... डोळ्याला डोळा लागत नाही कुठून तरी टिटवी टिवटिवत जाते... आपल्या घरावरून गेली तर किती बरं होईल "[१४] महत्वाच्या कामासाठी पैशाची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी पिल्ल विकायला काढलेला हारबा, आणि विकत घ्यायला आलेला पंडरी जेंव्हा पाहुण्याना खुष करावयाच आहे म्हणतो त्यावेळी लेखकाने अतिशय सुंदररित्या वातावरणनिर्मिती केली आहे -

" आणि हारबाच्या डोळ्यासमोर डुकरांचा प्रचंड आक्रोश आणि झाडांना उलटं टांगून भाजण्याची दृश्य फिरत गेली. पिलांचं लुचूलुचू लुचणं... त्यांचा चीत्कार ... सारं डोळ्यासमोरून फिरून गेलं" आणि तो पटकण बोलून गेला. " न्हाय बा पिलं इकायची न्हायीत."[२५]

" आता मध्यरात्र झाली होती सर्व रानं किकाळ्यांनी भरून जावे तसे आता वाटत होते. कधी नव्हते घुबडाच्या धुत्कारांना आणि कुत्र्याच्या रडण्याने ते दुभंगून गेले होते ... आणि शिलाही पाझरावी तसे काहीसे त्यानां वाटू लागले होते "[२६] शास्त्रीबुवांची नेमकी परिस्थिती ह्या वातावरणावरून दिसून येते. जर घुबड धुत्कारले किंवा कुत्र्याच्या रडण्याचा आवाज जर कानी आला तर समजले जाते की काळ आपल्या जवळ येतो आहे. त्यामुळे शास्त्रीबुवा हादरून जातात. त्यात अंजली वेड्यासारखी करते. त्यांची छोटी मुलगी त्याना पाहून थुंकते कोणीही त्याना प्रत्युतर देत नाहीत त्यामुळे ते खचले आहेत आणि नेमके याचवेळी वातावरणनिर्मिती कोत्तापल्लेनी मिळती जुळती घेतली आहे.

" अत्यंत क्षीण. मंद पण मधुर. घंटांचे नाद. थोडेही अवधान सुटले की आवाज निसटुन जायचे. मी प्राण तसाच कानात ठेवला आणि ऐकले... आवाजाची दिशा सांगता येणे कठीण होते. पूर्व की पश्चिम? उत्तर की दक्षिण? दिशाभ्रमच होत होता. पुन्हा एकदा आवाज ऐकला आणि ठरवले.. आणि आवाज माझ्या पाठीमागेच होता. मागे तोंड करून पाहायला लागलो. जीवाच्या आकांताने, पळता पळता मेलो तरी हरकत नव्हती ... "[२७] कथानायक वाळवंटात कसा आला हे त्यालाच कळत नाही

आणि अभ्युमन्यूसारखे चक्रव्युहात सापडल्यानंतर बाहेर कसे पडावे हे त्याला समजत नाही. तो इकडे तिकडे भटकतोच पाणी सुद्धा त्याला सापडत नाही. त्यात आशेचा एक किरण मिळतो की कोणीतरी येत आहे हे कशाद्वारे समजत तर निसर्गसुद्धा असा आहे की दुरवरची घटना येऊन सांगतो याचे चित्रण त्यांनी मार्मिकपणे केले आहे.

'' सकाळ झाली. दुसरा उजाडला. संघाच्या अर्ध्या चड्या रस्त्याने शिस्तीत फिरू लागल्या. आज सीमोल्लंघन. तेव्हा भारतधर्माचे रक्षण केले पाहिजे. म्हणून मोरूच्या बापाने मोरूला उठवले. मारू, मोरू, उठ, उठ. आज दसरा बघ सकाळ किती सुंदर आहे. अनेक कवींनी सकाळीवर कवनं लिहिली . लावण्या ही लिहिल्या. तेव्हां तू उठ. आज दसरा. '' [२८] कोत्तापल्लेनी दसरा उजाडलेल्या दिवसाचे वातावरणाचं वर्णनच वेगळ्या पद्धतीने केले आहे. त्यावरून वाटते की जर कोणत्याही शुभ गोष्टीला जर सुरवात करायची असेल तर ती दसऱ्यादिवशीच.

'' थंडगार वाऱ्याची झुळूक खिडकीतून आली. कसं प्रसन्न वाटलं. मंद निळसर दिव्यांचा प्रकाशसुद्धा प्रवाहित झालाय, तरंगतोय असं मोहनला वाटलं. त्याने आता आग्रहाखातर आणखीन थोडी घेतली होती आणि शांतपणे बोलणे ऐकत खात होता. एवढं चांगल अन्न तो आयुष्यात प्रथमच खात होता. तो मस्त धुंदीत खुश होता. कुठंतरी खोलवर असणारी विषादाची छटा आणखी खोल खोल कुठेतरी गाडून टाकू इच्छित होता. '' [२९] भ्रष्टाचारी लोकातून एकदाच बाहेर आपण सुटलो याचे मानसिक समाधान मोहनला होते. मुख्य म्हणजे मोहनला स्वत:चा विजय झाल्यासारखा वाटतो. तो या कारणाने की मंडळाच्या कॉलेजमध्ये शिवाजीरावानी घेण्याचे कबूल केले. तर इकडे शिवाजीरावांना जन्मभर गुलाम तरी तो राहील याचे समाधान वाटते. मनोहररावांना दोघांचीही बाजू राखल्याचा आनंद होतो. त्या आनंदाच्या प्रसंगाचे वातावरण मोहनरावसंदर्भात कोत्तापल्लेनी अतिशय सुंदररित्या मांडले आहे.

'' मृगाच्या पहिल्या सरीनी उन्मत होऊन जंगलातल्या हत्तीनी उधळावे आणि झाडाच्या बुंध्याशी मस्तवालपणे झोंबी घ्याव्यात तसा आठ दिवसांचा रिमांड मिळताच त्याला घेऊन देशमुख ठाण्यात शिरला होता. आज त्यांचा मुड काही वेगळाच होता जणू

सर्व ठरलेले असल्यानेच तो शीळ घालीत पोलीस व्हॅनमधन उतरला. ''उतर बे साल्या.'' असंच म्हणतच त्यांन त्याला दरदरा ओढतच लॉकपमध्ये टाकलं. आज तो अधिकच मुत्सदी दिसत होता. आदियुगातील जणू एखाद्या टोळीचा नायकच! काल - परवा काही घेणार का असं विचारणारा देशमुख जणू दुसराच कुणी होता.. '' ३० शिरसाळकर सज्जन आहे की गुंड किंवा छोटा आहे की मोठा आहे, काही पाटीलला माहीत नाही. पण शिरसाळकर हा कोणी मोठा असावा त्यामुळेच आपणाला शिरसाळकरच समजून देशमुखानी पकडलय. शिरसाळकरला पकडून आणणे मोठी गोष्ट असावी. त्यामुळेच देशमुख आपण काहीतरी मोठं काम केल्याच्या थाटात येतात. हे वातावरण कोत्तापल्लेनी केले आहे.

''संध्याकाळी साडेचार पाचची वेळ सगळयाना घरी जाण्याचे वेध लागलेले प्रत्येकजण फायली आवरतो आहे. आणि परत घड्याळाकडे पाहतो आहे. आणि प्रत्येकाला वाटते की आता कुठलंही 'अर्जंट' काम निघू नये. प्रत्येकाच्या डोळयासमोर घरचे परत गेल्यानंतरचे चित्र साकार होत होते. कुणी जांभया देत होता, कुणी कपाट बंद करीत होता. तर काहीजण नुसतेच साडेपाचची वाट पाहत सिगारेट ओढत बसून होते.'' [३१] हे ऑफिसच्या संदर्भातील वर्णन. संध्याकाळ म्हटले तर प्रत्येकाला स्वत:चे घर दिसते जसे चोराला वाटते चोरी करण्याची वेळ होत आहे तर अभिसारीकेला वाटते भेटायला जायची वेळ झाली हे जरी दररोज घडत असले तरी ते जसे वातावरण आहे तसे मांडण्याची शैली हवी. कोत्तापल्लेंची वातावरण निर्मिती संदर्भात शैली अतिशय चांगली आहे वाचक अगदी त्यामध्ये अंतरमुख होऊन जातो.

''दिवस कासराभर आला होता तरी पाणी पडत नव्हतं. ढग मातर ठिच्चून आलते. अजून दोन घटकानं पाटील दिवा घिऊन निगंल. वाजत गाजत शिवपस्तुर जाईल. शिवंच्या शेंड्याला गेलं की पाणी पडलं तर दिवा इझंल न्हाय तर ... '' ३२ पाणी म्हणजे जीवण. जर पाणीच नसेल तर. यांच्या गावात पाणी नाही की पाऊस नाही त्यामुळे गावातील सर्वलोक एकत्र येऊन देवीनं दिवा लावायला सांगीतला म्हणून पाटीलला दिवा लावायला सांगतात त्यापूर्वीचे हे वातावरण दिसते.

'' कुबट, कुंदट वास नाकात शिरतोच. पाऊस पडतोच आहे. धारा आता अंगाला खडच्यासारख्या लागताहेत समोरचा रस्ता दिसत नाही. गडगडाट चालूच आहे. आणि संबंध सृष्टी भूताने झपाटल्यासारखी रोरावत आहे. आम्ही वेगाने बुडखीकडे निघालो आहेत. कधी एकदा ओझं उतरवू असं झालंय.'' [३३] जेंव्हा सुरेशचा दादा मरतो त्या वेळेचा प्रसंग. गावातील चार पाचच लोक येतात त्यामुळे त्या प्रेताच ओझं त्याना होत. त्यात पाऊस येतोय. त्यावेळेच ते वातावरण लेखकाने अस्सलपणे चित्रित केले आहे.

असे हे वातावरण कधी पोषक, सहज मनातला भाव व्यक्त करणारे तर कधी नाट्यमयता स्पष्ट करणारे संवाद, तर कधी कधी हेच संवाद एखादे व्यक्तीचित्र सहजपणे उभे करतात. कथा, कांदबरी परिणामकारक होण्यासाठी व साहित्यिक आणि वाङ्.मयीन उंची वाढवण्यासाठी वातावरणनिर्मिती प्रभावी ठरते.

## ४.४) 'संदर्भ' आणि 'काफिला' कथासंग्रहातील सारखेपणा :

समाज हा व्यक्तींनी बनलेला असतो. व्यक्ती समाज असे हे गुंतागुंतीचे नाते आहे. यामधूनच जीवन घडत असते. व्यक्तींनी समाज घडत असतो. त्यांचे समाजात असणारे रंग ढंग चाली - रीती यामुळे व्यक्तीची ओळख होत असते. जसे संस्कार करावेत तशी व्यक्ती बनत असते. समाजाची परंपरा, संस्कृती, रूढी या संदर्भात माणूस प्रगत होत असतो. यातूनच त्याचे वेगळेपण समाजात सिद्ध होत असते. व्यक्ती आणि समाज यातील व्यामिश्र संबंधाचा शोध घेण्याचे अखंड कार्य कलावंत करत असतो. समाजाच्या संदर्भात माणूस आणि माणसाच्या तळाचा शोध घेण्याचा प्रयत्न खरा कलावंत करीत असतो.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी अशा अनेक व्यक्तींचे चित्रण केले आहे. काही कथा मात्र सारख्याच वाटतात. याचा अर्थ त्याच घटना किंवा वर्णन असे नाही तर अविवाहित एकलकोंड्या व्यक्तींची वर्णने. अर्थात बाई विना बुवाचे काय हाल होतात सांगणारी 'वणवा' ही कथा वाटते. या कथेत जपानी बाईची आठवण त्याचबरोबर तेथील नग्न मुर्ती या विषयी आकर्षण. या कथानायकाला स्त्रीसुख म्हणून मिळालेच नाही. मानवी जीवनात

पोटाच्या भुकेबरोबर शारीरिक भूकही तितकीच असते. जर ते सुख त्याना उपभोगायला मिळाले नाही तर व्यक्तीची अवस्था वरीलप्रमाणे पहावयाला मिळते. अशीच 'कथा:अख्या हिंमतरावाची' ही कथा आहे. हिंमतराव हा अविवाहीत आहे याची भूक भागविण्यासाठी बाई असते पण तरीही त्याला अतुरता आहे त्याच्या प्रेयसीची. इतर स्त्रियांशी केलेला स्पर्श आणि विद्याला केलेला स्पर्श यांच्यात वेगळेपणा त्याला वाटतो. 'दात' या कथेत रंगा हा देखील अविवाहीत आहे पण दोन वेळच्या पोटाचे मिळवू शकत नाही. 'पाणी' कथेतील कथानायक दिडशे सांडणीस्वार हसत खेळत जात होते पण त्यांच्यात एकही स्त्री नव्हती हे पाहून तो म्हणतो, ही माणसं स्त्रियाशिवाय कशी राहत असतील बुवा ? आपणाला तर ते शक्यच नाही. कधी मन उदास झाले की कुणाही ओळखीच्या तरूणाशी गप्पा मारून येतो. की एकदम प्रसन्न .. '' [३४]

'छेद' या कथेतील कथानायक हा एक धर्मोपदेशिकेच्या नकळत प्रेमात पडतो. आणि तिच्याविषयी स्वप्न पाहतो. 'तर हे असं!' ही कथा सुद्धा अशाच प्रकारची यामधील कथानायक याला कोणतीच वासना राहिली नाही शेवटी त्याची प्रेयसी निर्मला त्याला तो बाप होणार असल्याचे सांगते तरीपण त्याची उत्सुकता लग्नाविषयी दिसत नाही. तर 'कंकालेश्वर' या कथेतील कथानायक याला समजते की कंकालेश्वर मंदीराचे खांब सारखे मोजले तरीही एकच येत नाही, याच्यातच तो गुढ होतो. 'हकिकत: वास्तवातली या कथेतील राघव हा देखील अविवाहीतच आहे. याला एक व्यक्ती की जी स्वत:ला हैद्राबादचे नबाब समजते. ते म्हणतात की, माझ्या सुंदर मुलीशी जवळ रहा आणि विशेष म्हणजे संभोग ठेव त्यामुळे तीचे वेडेपण जाईल. या विचारने आजारी पडलेला राघव या कथेत दिसतो.

''बाहुल्यासारखा'' कथामधील तो नायक हा देखील स्वप्न पाहतोय आपल्या प्रेयशीविषयी. 'फसवणुक' या कथेतील नायक हा सुद्धा एक अविवाहीतच आहे. प्रेम आंधळे असते हे म्हणतात ते खोटे नाही कारण याला जेंव्हापर्यंत कमल हवी होती तोपर्यंत ती आंधळी आहे याचा विचार केला नाही पण वडील मेल्याच्या आघाताने कमल बाबतीत नकोते घडून बसते. त्यावेळी मात्र ' एका आंधळीबरोबर आपण काय केलंय' [३५] याच वाईट वाटतं. 'पाठलाग' मधील रघुसुद्धा लग्नापूर्वी राणीवर प्रेम करायचा. ती विवाहीत

असूनसुद्धा ती याला भेटत असायची. पण रघुला आता वाटते आपण संसार असा करायचा की राणीचीसुद्धा दृष्ट आपल्या संसाराला लागावी.

नागनाथ कोत्तापल्लेंच्या कथेतील सारखेपणा म्हणजे एकच व्यक्ती म्हणजे उदाहरणार्थ अविवाहीत व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारात विभागून दाखविली आहेत पण शेवटी याच्यातून एकच निष्कर्ष निघतो की, कोणताही पुरूष शेवटी स्त्रीशीवाय चांगले जीवन जगूच शकत नाही.

अविवाहीत पुरूषांच्याप्रमाणेच गरोदर स्त्रियांविषयीचे चित्रण कथांमधून दिसते. त्यांच्या कथांमधून जीवनाचे अनेक अर्थ समजत जातात. समाजात कसे वागावे याचा नकळत बोध होत जातो. 'तर हे असं! या कथेतील निर्मला किती उत्सुकतेने त्याच्याकडे येते आपण गरोदर असल्याचे त्याला सांगते. जीवापाड प्रेम करणारी लग्नापूर्वी त्याला स्वत:चे शरीर देणारी पण त्याकडे दुर्लक्ष करणारा तो नायक आणि ती भोळी सतत आनंदाने बोलणारी. लग्नाविषयी सर्व तयारी करून आलेली कारण तिचा त्याच्यावर विश्वास आहे म्हणून. पण ती त्याचे मन ओळखत नाही फक्त सतत त्याला एवढेच विचारते, ' मुलगा होईल की मुलगी रे?'' [३६]

'ओहळ' या कथेतील वसुधा गरोदर आहे. पतीप्रेमापोठी स्वत:च्या मनात नसुनसूद्धा त्याचा दिनवाणा चेहरा पाहून त्याला जवळ बोलावते पण त्यातून शेवट मात्र होतो तो तिच्या गर्भपातात. 'कळा ज्या लागल्या जीवा' याकथेमध्ये दहा दिवसात हॉस्पीटलमध्ये आलेल्या अनेक स्त्रिया. त्यांच्या डिलेव्हरीसंबंधीची माहिती वेगवेगळ्या स्वरूपात दिसून येते. 'चक्र' या कथेत कथानायक बापू याची बहीण ताई ही गरोदर आहे. याचे चित्रण येते. ग्रामीण भागात असे दिसून येते की, डिलेव्हरीच्यावेळी किंवा कोणीतरी आजारी असेल तर कोणाचेतरी नाव घेणे किंवा त्याच्या नावाने अंगारा लावणे यामुळे लवकर बरे होते असा समज आहे. त्याप्रमाणे या कथेतील मास्तराचे नाव निघाले की बाईची सुटका होते यासंबंधीचे चित्रण आले आहे. अशाप्रकारे गरोदर आणि डिलेव्हरीसाठी गेलेल्या वेगवेगळ्या स्त्रियांचे अस्सलपण कथांतून दिसते.

पती - पत्नीविषयी ताणतणाव प्रेम याचे चित्रण त्यांच्या काही कथातून दिसून

येते 'काळोख हुंकार' मधील शास्त्रीबुवा हा पत्नी आजारी असल्यामुळे तिच्यापासून दूर दूर होत असतो. 'दसरा उजाडला' यामध्ये दसऱ्याचे उत्सुकतेने स्वागत करणारे पती - पत्नी दिसतात. त्याचबरोबर त्यांच्यात एकमेकाविषयी प्रेम जाणवते. 'ओहोळ' मधील पती - पत्नीचे एकमेकावर प्रेम असूनसुद्धा शारीरिक सुखापुढे त्याना दुसरे काही जाणवत नाही त्यामुळे पदरात पडलेले दु:ख. 'पिंटीची गोष्ट' मधील पिंटीची आई - वडिलांचं थोडक्यात आलेले प्रेम. 'घर' कथेत चिमणा - चिमणींच्याद्वारे कथेतील पती - पत्नींची चाललेली अप्रत्यक्ष भांडणे दिसतात. 'कळा ज्या लागल्या जीवा' या कथेतील सुधा - सतीश यांचे प्रेम. सतीश एक दिवस दवाखाण्यात आला नाही तर त्याचा विचार करून झोपलेली सुधा. तिला पडलेले सतीशविषयी स्वप्न आणि त्यानंतरची तिची नंतरची चलबिचल यातून त्यांच्यात किती प्रेम आहे हे दिसते.

'विदूषक' या कथेत राजा व राणी यांच्यातील प्रेम. राणी राजाच्या प्रेमाखातर त्यांच्याबरोबर दुसऱ्या मुलीला पाठवून द्यायची तयारी दाखवते. एक आपण पट्टराणी असून सुद्धा राजाच्या मनाचा विचार करणारी स्त्री दिसते. या कथेतच 'गोष्ट : पहिली' यामध्ये पती - पत्नींची भांडणे होतात. पती हा काव्य लिहतो पण त्यातून पैसा मिळवत नाही त्यामुळे त्यांच्यात भांडणे. एकदिवस शेटजी स्वत:चे चरित्र लिहून घेण्यासाठी पैसे घेऊन येतो. कवीची परवानगी मिळण्यापूर्वी कवीपत्नी पैसे घेऊन घरात जाते त्यानंतर त्यांच्यात भांडणे होतात जेंव्हा ती त्यांच्यावरच दोष ठेवते त्यावेळी मात्र त्याचा मृत्यू होतो. त्याच कथेतील 'गोष्ट: दुसरी' यामध्ये पती-पत्नींच्या भांडणात पत्नी आत्महत्या केल्याचे चित्रण येते.

'कोर्टाचा हॅंग ओव्हर' मध्ये वकीलावर प्रेम करणारी त्यांची पत्नी दिसते. 'पुरूष' या कथेतील नायक हा सुनंदावर अतिशय प्रेम करतो पण आईमुळे सुनंदाला सोडून दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करतो. एकदिवस पहिल्या पत्नीवर त्याचे प्रेम असल्याने तो तिला भेटायला जातो. तिचे ही त्याच्यावर प्रेम आहे ,पण समाज आडवा येतो. याचे भान तिला असल्याने ती दाखवत नाही याचे चित्रण येते. 'पाठलाग' या कथेतील रघू आणि राणीचे एकमेकावर प्रेम असते पण रघूचे लग्न मंदाबरोबर होते. रघुने मंदाबरोबर संसार करण्याचे पाहिलेले स्वप्न पण राणीचीच त्याला येत असलेली आठवण. रघु हा मंदावरच प्रेम करतोय

हे दाखवणारा अशी वेगळीच कलाटणी घेणारी कथा दिसते. 'राखण' या कथेतील थोंडिबा पणघटला वाटते की, आपल्या पत्नीसारखी नाजुक सुंदर अशी दुसरी बाई नाही त्यामुळे आपले मित्र वगैरे आपल्या पत्नीकडे पाहतील या हेतूने मित्राना घरी यायचे बंद करतो तिला एकटील बाहेर सोडत नाही. त्यात त्याला सोडून पळून गेलेली त्याची पत्नी याचे चित्रण येते.

कोत्तापल्लेंच्या कथामधून कौटुंबिक जीवनाचे चित्रण जास्त प्रमाणात दिसते. त्यांच्या कथामधून सामाजिक जीवनातील अंध श्रध्दा, भ्रष्टाचारीचे याचेच चित्रण येते त्यामुळे कथा वेगवेगळया प्रकारात मोडल्या तरी कथा सारख्याच आहेत असे वाटते. 'विनोद' ही कथा भ्रष्टाचारी लोकातून सापडलेल्या एका तरूण मोहनराव यांच्यासंदर्भात कथा आहे. 'मया' कथेमध्ये पत्नी गरोदर आहे त्याहीपेक्षा त्याचे दिसून येणाऱ्या प्राण्याविषयांची प्रेम या कथेत येते. 'काळोखात हुंकार' ही कथा एका वेगळ्याच प्रकारात येते. यामध्ये अंध:श्रध्दा आहे. शारीरिक सुख हवेतेवढे मिळाले नाही त्यामुळे वखवखलेला शास्त्रीबुवा दिसतो. 'पाणी' या कथेमध्ये नायक वाळवंटात फसला आहे तेथे पाणी मिळत नाही. स्वत:ला जर पाणी हवं असेल तर उंटाचा खून त्याला करावा लागणार त्याच्या पोटातील पाण्याची पिशवी काढावी लागणार. ही कथा 'विकृती' या प्रकारात मोडते.

'दसरा उजाडला' ही कथा धार्मिकतेमध्ये मोडते ' काळोखात उतरून' या कथेतील कथानायकाने जीवनात आलेल्या अनेक समस्या उतरविल्या आहेत पण त्याला प्रत्यक्षात उतरविता येत नाहीत. अधांतरी युधिष्टरसारखी त्याची परिस्थिती झाली आहे. 'दिवा' या कथेत सामाजिक जीवनाचे चित्रण येते. पाऊस पाणी काहीच नाही त्यामुळे त्रासलेले लोक, त्याना वाटते की पाणीसुद्धा आता विकत द्यावे लागणार की काय? यासाठी देवीने सांगितल्याप्रमाणे दिवा लावण्याविषयीचा प्रकार यामध्ये दिसतो.

दैनंदीन जीवनातील घडामोडी यांचे चित्रण कथामधून केले आहे. वास्तवाला कल्पनेचे रूप देऊन तर कधी कल्पनेला वास्तवाचे रूप देऊन लेखक कलाकृती निर्माण करीत असतो. व्यक्ती व्यक्तीमधील संबंध, जाणीव - नेणीव यातील व्यापकतेचा शोध

घेणे ज्या कलाकृतीला जमलेले असते ती कलाकृती अमर होते. अशा आशयसंपन्न घटनांच्याद्वारे कोत्तापल्लेनी कथासंग्रह कादंबऱ्या यांची निर्मिती केली आहे.

## ४.५)वैशिष्ट्ये :

नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'काफिला' आणि 'संदर्भ' या कथासंग्रहांचा विचार करता आपल्याला दिसते की, त्यांच्या कथेतील कथानकाचा अभ्यास करताना कथाबिजातील विस्तारातूनच कथानक साकारत असते. प्रत्येक कथेत एक मध्यवर्ती कल्पना असते. त्यांच्या सर्वच कथा ह्या घटनाप्रधान आहेत. कथानकात घटना प्रसंगाची गुंफण विशिष्ट प्रकारे केलेली आहे. समाजात घडणाऱ्या दैनंदिन जीवनातील अनेक घटना प्रसंगाचे चित्रण कथेतून दिसते.

कथातील पात्रांच्या स्वरूपाचा अभ्यास करताना ही पात्रे विशेषत: मध्यम वर्गातून आलेली आहेत तर काही अती गरीब अशी आहेत की जी दोन वेळचे अन्न मिळवू शकत नाहीत. या पात्रांवर नियतीचा प्रभाव जाणवतो. त्यामुळे आलेल्या दु:खासमोर ती हतबल अगतिक ठरलेली आहे. त्यांच्या कथातून तरूण स्त्री, पुरूष यांच्याबरोबर लहान मुले, वृध्द स्त्रिया यांचे चित्रण पहायला मिळते. विवाहित अविवाहित तरूण - तरूणी यांचे मध्यमवर्गीय जीवन तसेच राजघराण्यातील राजा कथातून दिसतात. पोलीस खाते, वकीलीखाते त्याचबरोबर उच्च लोकांची भ्रष्टाचारी त्यात खचलेली दुबळी जनता, स्त्रिया यांचे मार्मिक चित्रण येते.

संवादातून पात्रांच्या अंतरंगाचे दर्शन घडते. तसे पात्रांचे चित्रणही संवादातून घडते. स्त्री पात्रांचा अभ्यास करताना काही ठिकाणी जुन्या संस्कारांचा पगडा दिसतो तर काही ठीकाणी सध्याची सुशिक्षित महिला दिसते. काही स्त्रिया सोशिक व हतबल दिसतात. ह्या कथा - संग्रहातून आढळून आलेली वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे :-

१) कथेची भाषा साधी , सोपी, अर्थगर्भ तितकीच अलंकृत आहे.

२) प्रसंग - घटना यांचे प्रभावीपणे चित्रण केले आहे.

३) कथेतील निवेदन प्रथम पुरूषी, तृतीय पुरूषी मध्ये तसेच कुशलतेने दिसते.

४) वातावरण निर्मिती अतिशय चपखल रीतीने केली आहे त्यामुळे कथेला सजिवता आली आहे.

५) समाजातील रूढी, परंपरा, चाली- रिती, संस्कृती याचे चित्रण कथामधून आले आहे.

६) सरकारी खात्यातील भ्रष्टाचारीचे सडेतोडपणे चित्रण केले आहे.

७) सामाजिक जीवनातील अंधश्रद्धा आणि त्याला फसलेला समाज याचे चित्रण आले आहे.

८) म्हणी, वाक्यप्रचार, सुभाषिते यांचा वापर केला आहे.

९) स्वप्नसृष्टीत गुंतून राहणाऱ्या तरूण तरूणींचे चित्रण कथेमधून आले आहे.

१०) स्त्री- पुरूष यांच्यातील प्रेमाचे चित्रण केले आहे.

११) मानवी जीवनातील एकाकीपणामुळे त्रासलेल्या लोकांचे जीवन मांडलेले आहे.

१२) कथेची सुरवात आणि शेवट यामध्ये योग्य समतोल साधला आहे.

१३) मध्यमवर्गीय कुटुंबातील लोकांचे जीवन चित्रण कथांतून दिसते.

# सारांश

'काफिला' आणि 'संदर्भ' या कथालेखनाचे अन्यविशेष मध्ये घटना - प्रसंग यांचे चित्रण आले आहे. कोणतीतरी घटना घडत असते म्हणूनच साहित्याची निर्मिती होत असते. समाजामध्ये अनेक घटना घडतात मग त्या राजकारणतल्या असो किंवा शैक्षणिक असो काही सुखकर घडतात तर काही दु:खात्मक घटना घडत असतात यामये दु:खाच्याच घटना जास्तप्रमाणात घडतात. कोत्तापल्लेनी जीवनातील येणाऱ्या अनेक घटनाप्रसंगाचे चित्रण केले आहे. त्याचप्रमाणे कथांमधून येतात ती सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार यामुळेच त्यांची शैली ओळखता येते. अडाणी अशिक्षित लोकांच्यामध्येंच म्हणीचा वापर बोलण्यातून जास्तप्रमाणात होतो . त्याचबरोबर आशयाला व्यवस्थित रूप प्राप्त होण्यासाठी याचा वापर केला जातो. यांच्या कथासंग्रहातून म्हणी वाक्यप्रचार काही प्रमाणात आले आहेत.

वातावरणाला कथासंग्रहात महत्व आहे वातावरणामुळे काहीवेळा कथेत घटना कशासंदर्भात आहे हे समजते कोत्तापल्लेनी कथेला साजेल अशी वेळोवेळी वातावरणाची निर्मिती केली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या कथांमधून अविवाहीत व्यक्ती, पतीपत्नीप्रेम, तणाव लहान मुलांचे भावविश्व तसेच गरोदर स्त्रिया यांचे वेगवेगळ्या घटना, कार्य घेऊन चित्रण जास्तप्रमाणात आलेले दिसते. कथा कशाप्रकारात येते त्याचबराबर कथा लिहण्याची त्यांची पद्धत, योग्य विषय आहेत की नाहीत तसेच त्यांचे साहित्य प्रसिध्द होण्यामागे नेमकी कोणती वैशिष्टचे आहेत याचे चित्रण केले आहे.

# संदर्भ -टीपा


१. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ११३

२. तत्रैव पृ.क्र. २६

३. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. ५

४. तत्रैव पृ.क्र. ४५

५. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ. क्र. ८७

६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. १७

७. डॉ. व्यवहारे, शरद : 'लोकसाहित्य उद्‌गम आणि विकास'
पृ.क्र. ८९

८. कोत्तापल्ले, नागनाथ 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
पृ.क्र. ९

९. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
पृ.क्र. २१

१०. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. ५

११. तत्रैव पृ.क्र. ८५

१२. तत्रैव पृ.क्र. १००

१३. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. २९

१४. तत्रैव पृ.क्र. ६४

१५. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र. २४

१६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. १२

१७. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
पृ.क्र. ५

१८. तत्रैव पृ.क्र. २

१९. कोत्तापल्ले नागनाथ : 'काफिला'
पृ.क्र. ३१

२०. तत्रैव पृ.क्र. २२

२१. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती १९८३
पृ.क्र.६२

२२. कुलकर्णी, वा.ल. : 'जीवंत रेखीव कथा'
आलोचना ऑक्टोबर १९८७
पृ.क्र. ५

२३. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
पृ.क्र. ४८

२४. तत्रैव पृ.क्र. १२

२५.कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
पृ.क्र. १३१, १३२

२६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
पृ.क्र. ६

२७. तत्रैव पृ.क्र. १५

२८. तत्रैव पृ.क्र. २९

२९. कोत्तापल्ले नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
पृ.क्र. २६

३०. तत्रैव पृ.क्र. ४०

३१. तत्रैव पृ.क्र. ५८

३२. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन, नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. ६८

३३. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
पृ.क्र. १११

३४. तत्रैव : 'काफिला'
पृ.क्र. १६

३५. कोत्तापल्ले, नागनाथ : 'संदर्भ'
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर
प्रथमावृत्ती
पृ.क्र. ८२

३६. कोत्तापल्ले, नागनाथ : 'काफिला'
शारदा प्रकाशन नांदेड
प्रथमावृत्ती जुलै १९८१
पृ.क्र. २८.